स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६—२७/३३०

दि. ३०/१०/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्युरो या बिगर—सरकारी संस्थेमार्फत दि. १५ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या 'सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा' उपक्रमाबाबत ...

संदर्भ: १.मा.सहसंचालक(उच्च शिक्षण), सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचे जा.क्र. ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२६/३१८१७७०,दि.१९/१०/२०२६ रोजीचे पत्र
२. मा.कुलसचिव यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी मेलद्वारे अग्रेषित

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्युरो(NCIB) या बिगर—सरकारी संस्थेमार्फत दि. १५ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर 'सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा' हा जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये सदर अभियानांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियाशी संबंधित सायबर धोके, डिजिटल सुरक्षा तसेच नशेच्या वाढत्या प्रवृत्तीचे सामाजिक, शारीरिक, मानसिक व शैक्षणिक दुष्परिणाम याबाबत जनजागृती करणे. या उपक्रमाबाबत फेसबुक, व्हाट्सॲप व इतर सोशल मिडीयाच्या माध्यमातून जास्तीत जास्त प्रसिध्दी द्यावी. सदर उपक्रमाचे My Bharat पोर्टलवर Event Create करून माहिती अपलोड करण्यात यावी.

तसेच याबाबतचा अहवाल BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा २०२६"** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. अहवाल सादर करताना 'संक्षिप्त अहवाल/अभिप्राय/टिपणी/प्रतिक्रीया' याठिकाणी सदर उपक्रमाकरिता सहभागी विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी. सदर उपक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.

संचालक(अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
Web-www.jdhepune.in E-mail:jdhepune@gmail.com
फोननं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्सनं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२६/३१८१७७० दि. १९-१०-२०२६

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व सार्वजनिक अकृषि विद्यापीठ/अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे. पुणे.
३. प्राचार्य, अशासकीय अनुदानित/विनअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये, **पुणे अहिल्यानगर व नाशिक जिल्हे.**

विषय :- नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (NCIB) या बिगर-सरकारी संस्थेमार्फत दि. 15 ते 30 नोव्हेंबर 2026 या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या "सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा" कार्यक्रमाबाबत.

संदर्भ:- १. शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-2026/ई-593546/विशि-5, दि. 06.10.2026.
२. मा. उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/मवि-1/नशा मुक्त भारत अभियान/ई-3051208 दि. 16.10.2026.

उपरोक्त विषयाबाबत मा. उच्च शिक्षण संचालनालयाचे दि. 16.10.2026. पत्रासोबत संदर्भीय शासनपत्रान्वये नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (NCIB) या बिगर-सरकारी संस्थेमार्फत दि. 15 ते 30 नोव्हेंबर 2026 या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर "सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा" हा जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

सदर अभियानांतर्गत विद्यार्थी व तरुणांमध्ये सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियाशी संबंधित सायबर धोके, डिजिटल सुरक्षा तसेच नशेच्या वाढत्या प्रवृत्तीचे सामाजिक, शारीरिक, मानसिक व शैक्षणिक दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्याचा उद्देश आहे. तसेच विद्यार्थ्यांना सायबर

गुन्हे व नशेच्या दुष्परिणामांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक माहिती व प्रतिबंधात्मक उपायांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने शासनपत्र तसेच सोबतच्या पत्रातील बाबी विभागातील सर्व विद्यापीठातील तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. तसेच सदर जनजागृती अभियानाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

सोबतः वरीलप्रमाणे.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 19-10-2026
13:14:21

(डॉ.अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे -४११०१६

फोननं. 020-26122119 Web :www.dhepune.gov.in Email : director.dhepune@nic.in

क्र. उशिसं/मवि-१/नशा मुक्त भारत अभियान/ई- ३०५१२०८ दि. स्वाक्षरीनुसार

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

२. कुलसचिव, राज्य सार्वजनिक विद्यापीठ.

विषय :- नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (NCIB) या बिगर-सरकारी संस्थेमार्फत दि. १५ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या **"सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा"** कार्यक्रमाबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२६/ई-५९३५४६/विशि-५, दि. ०६.१०.२०२६.

उपरोक्त विषय व संदर्भीय शासनपत्रान्वये कळविण्यात येते की, नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (NCIB) या बिगर-सरकारी संस्थेमार्फत दि. १५ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर "सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा" हा जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

सदर अभियानांतर्गत विद्यार्थी व तरुणांमध्ये सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियाशी संबंधित सायबर धोके, डिजिटल सुरक्षा तसेच नशेच्या वाढत्या प्रवृत्तीचे सामाजिक, शारीरिक, मानसिक व शैक्षणिक दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्याचा उद्देश आहे. तसेच विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे व नशेच्या दुष्परिणामांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक माहिती व प्रतिबंधात्मक उपायांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

तरी, संदर्भीय शासनपत्र व त्यासोबतच्या पत्रातील बाबी आपल्या अधिनस्त महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. तसेच सदर जनजागृती अभियानाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी .

सोबत: वरीलप्रमाणे.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 16-10-2026 16:55:34

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)

प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

प्रत: अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi5.hted-mh@mah.gov.in

---

क्र संकीर्ण २०२६ / E १५९३५४६ / वि शि ५ दिनांक :- ०६ /१०/२०२६

प्रति- संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
पुणे.

विषय - **नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो** (NCIB) या बिगर-सरकारी संस्थेने (NGO) दि.१५ ते ३० नोव्हेंबर २०२६ दरम्यान राष्ट्रीय स्तरावर **आयोजित केलेला "सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा" कार्यक्रम संदर्भात**

संदर्भ -इंजि. संजय अशोक रोडे, स्टेट डायरेक्टर,: नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो (NCIB), महाराष्ट्र राज्य (बिगर-सरकारी संस्था) दि. १७/०९/२०२६ चे पत्र (प्राप्त दि. ०६/१०/२०२६)

महोदय,

विषयांकित संदर्भाधीन पत्रामध्ये नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो (NCIB) ही बिगर-सरकारी संस्था (NGO) दि. १५ ते ३० नोव्हेंबर २०२६ कालावधीत राष्ट्रीय स्तरावर "सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा" हा कार्यक्रम आयोजित करणार असल्याचे नमूद केलेले आहे.

तरी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने या विभागाच्या संबंधित बाबी संदर्भात नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(प्रविण अकोलकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत - वरीलप्रमाणे

National Crime Investigation Bureau
राष्ट्रीय अपराध जाँच ब्यूरो

(An ISO 9001: 2015 Certified Non Governmental Organization)
(Registered under Indian Trust Act 1882)

२१ SEP २०२६

मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण
संसदीय कार्य, महाराष्ट्र शासन
मंत्रालय मुंबई ४०० ०३२

उ.तु.स. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री कार्यालय क्र. 11030664 दि. 05/10/26

कार्यालय क्र. 11030664
दिनांक 30/9/26

संदर्भ:- NCIB/महाराष्ट्र/०१

दिनांक:- १७/०९/२०२६

प्रति,
मा. शिक्षण मंत्री साहेब,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

अ.मु.स. (उच्च व तंत्र शिक्षण)
करीता राज्यपाल आस्थापना कार्यासनी कार्यभार
C.B.Patil

(चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

विषय: राष्ट्रीय स्तरावर "सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा" आयोजित करण्यासाठी सहकार्य आणि महाराष्ट्र राज्यातील संबंधित शिक्षण विभाग व अधिकारी यांना आवश्यक निर्देश जारी करण्याबाबत.

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून, मी संजय अशोक रोडे, स्टेट डायरेक्टर, नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (NCIB), महाराष्ट्र राज्य, आपणास या पत्राद्वारे निवेदन देत आहे की, NCIB संस्था भारतीय न्यास अधिनियम १८८२ अंतर्गत नोंदणीकृत एक बिगर-सरकारी संस्था आहे, जी गेल्या १५ वर्षांपासून गुन्हे नियंत्रण, नागरिक जनजागृती, नशा मुक्ती, सायबर सुरक्षा, महिला आणि बाल सुरक्षा तसेच सामाजिक हिताच्या विविध क्षेत्रात महाराष्ट्रमध्ये व देशपातळीवर सातत्याने कार्यरत आहे. त्याच अनुषंगाने संस्थेद्वारे **दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर "राष्ट्रीय सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा" आयोजित करण्यात येत आहे.** या अभियानाअंतर्गत संस्थेच्या सदश्यांद्वारे आणि स्वयंसेवकांद्वारे महाराष्ट्र राज्यातील विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. या कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियाशी संबंधित सायबर धोके, डिजिटल सुरक्षा आणि सायबर गुन्ह्यांपासून बचावाचे व्यावहारिक उपाय याबाबत जागरूक केले जाईल. तसेच, तरुणांना नशेच्या वाढत्या प्रवृत्ती आणि त्याचे सामाजिक, शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक दुष्परिणाम याबाबत अवगत करून त्यांना नशेपासून दूर राहण्यासाठी आणि नशामुक्त व निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रेरित केले जाईल, व जनजागृती केली जाईल. या अभियानाचा मुख्य उद्देश आपल्या राज्यातील व संपूर्ण देशातील विद्यार्थी आणि तरुणांमध्ये झपाट्याने वाढत असलेल्या सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक आणि नशेच्या आहारी जाण्याच्या प्रवृत्तीबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना यापासून बचावासाठी आवश्यक माहिती आणि व्यावहारिक उपाय उपलब्ध करून देणे हा आहे. संस्थेचा प्रयत्न आहे की, या अभियानाच्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत मोफत जनजागृती आणि प्रशिक्षण सामग्री पोहोचवली जावी आणि त्यांना सुरक्षित डिजिटल व्यवहार आणि नशामुक्त जीवनाबद्दल जागरूक केले जावे.

मा. महोदय, या राष्ट्रीय स्तरावरील अभियानाला अधिक प्रभावी आणि व्यापक बनवण्यासाठी संस्थेला राज्यांमधील विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबवण्यासाठी राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या सहकार्याची आवश्यकता आहे. म्हणून आपणास नम्र विनंती आहे की, राष्ट्रीय हित आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला लक्षात घेऊन, आपल्या राज्याचे प्रधान सचिव, शिक्षण विभाग यांना आवश्यक निर्देश/सूचना देण्याची कृपा करावी, जेणेकरून राज्य शासनाच्या संबंधित शिक्षण विभागाद्वारे त्यांच्या अधीनस्थ शाळा आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांना/मुख्याध्यापकांना NCIB संस्थेशी समन्वय साधून या राष्ट्रीय जनजागृती अभियाना अंतर्गत आवश्यक सहकार्य प्रदान करण्यासाठी निर्देशित केले जाईल. राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या सहकार्याने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केल्याने विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षा आणि नशामुक्तीचा महत्त्वाचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचवला जाऊ शकेल. तसेच यामुळे विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे आणि नशेच्या दुष्परिणामांपासून वाचवण्यात आणि त्यांच्या सुरक्षित आणि उज्ज्वल भविष्याच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण मार्गदर्शन व योगदान मिळेल.

National Crime Investigation Bureau
(A Public Movment for Crime and Corruption free Nation)
National Crime Investigation Bureau is registered under Indian Trust Act as NGO Working as Criminal Information provider agency. We are not Investigation Agency, We have no tie-up with any Central / State Govt. Department / CBI / Police, MHA etc.
Opp Civil Court, Main Lucknow Road Post HPO, Gonda, Uttar Pradesh, India – 271001
info@ncib.in +918795111000 / +919792580000 ncib.in

National Crime Investigation Bureau
राष्ट्रीय अपराध जाँच ब्यूरो

(An ISO 9001: 2015 Certified Non Governmental Organization)

(Registered under Indian Trust Act 1882)

महोदय, आम्ही हे देखील आश्वासन देतो की, **संस्थेद्वारे राबवले जाणारे सर्व जनजागृती कार्यक्रम मोफत, बिगर-राजकीय आणि पूर्णपणे जनहितार्थ आयोजित केले जातील आणि संबंधित शाळा/महाविद्यालय प्रशासन आणि शिक्षण विभागाने निर्धारित केलेल्या नियम आणि मार्गदर्शक सूचनांचे पूर्णपणे पालन केले जाईल.** आपणास पुन्हा नम्र विनंती आहे की, **"राष्ट्रीय सायबर सुरक्षा आणि नशामुक्त भारत पंधरवडा - नोव्हेंबर-२०२६"** यशस्वी करण्यासाठी आपण राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या प्रमुखांना आवश्यक सहकार्य आणि समन्वयासाठी योग्य अधिकृत निर्देश जारी करून त्याची प्रत संस्था मुख्यालयाला उपलब्ध करून देण्याची कृपा करावी.

आपले सहकार्य महाराष्ट्र राज्यातील हजारो विद्यार्थी आणि युवकांना सायबर गुन्हे तसेच अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जागरूक व सुरक्षित करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान ठरेल.

धन्यवाद,

आपला विश्वासू,

17/09/2026

National Crime Investigation Bureau NCIB Maharashtra

इंजि. संजय अशोक रोडे,
स्टेट डायरेक्टर, महाराष्ट्र राज्य,
नॅशनल क्राईम इन्व्हेस्टिगेशन ब्युरो
(नोंदणीकृत बिगर सरकारी संस्था)
मो. ९४०५०७०७७०

माहितीसाठी प्रत - १) मा. राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य.
२) मा. मुख्यमंत्री व गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य.
३) NCIB मुख्यालय.

2/2